सत्यमेव जयते

# महाराष्ट्र विधानसभा

# नियम समितीचा अहवाल

# २०२५

(दिनांक ०८ डिसेंबर, २०२५ रोजी विधानसभेस सादर केला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर
डिसेंबर, २०२५.

# महाराष्ट्र विधानसभा

# नियम समितीचा अहवाल

# २०२५

# विधानसभा नियम समिती
(२०२४-२०२५)

## समिती प्रमुख

(१) ॲड. राहुल नार्वेकर, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा
तथा समिती प्रमुख

## सदस्य

(२) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(३) श्री. अमित साटम, वि.स.स.

(४) डॉ. संजय कुटे, वि.स.स.

(५) श्री. किसन वानखेडे, वि.स.स.

(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(७) श्री. दीपक केसरकर, वि.स.स.

(८) श्री. अमोल पाटील, वि.स.स.

(९) श्री. प्रकाश सोळंके, वि.स.स.

(१०) श्री. सिध्दार्थ खरात, वि.स.स.

(११) श्री. अमित देशमुख, वि.स.स.

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्रीमती मेघना तळेकर, सचिव - २
(२) श्री. सुभाष नलावडे, सह सचिव (स.) तथा वि.का.अ.
(३) श्रीमती संगिता विधाते, अवर सचिव (स.)
(४) श्रीमती जयश्री म्हात्रे, कक्ष अधिकारी.

# अहवाल

मी, समिती प्रमुख, विधानसभा नियम समिती, समितीच्या वतीने अहवाल सादर करण्यास मला प्राधिकृत केल्यावरुन विधानसभेला हा अहवाल सादर करीत आहे.

२. महाराष्ट्र विधानसभा विनंती अर्ज नियमात सुधारणा करण्यासाठी मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा तथा समिती प्रमुख यांच्या दिनांक १३ मे, २०२५ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने विनंती अर्ज समितीकडून प्राप्त झालेली सूचना समितीपुढे विचारार्थ होती. या सूचनेच्या अनुषंगाने व्यापक विचारविनिमय होण्याच्या दृष्टीने समितीची मंगळवार, दिनांक १८ नोव्हेंबर, २०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. समितीकडे प्राप्त झालेली सूचना "अनुसूची-एक" मध्ये देण्यात आली आहे व समितीने मान्य केलेली सूचना "अनुसूची - दोन" मध्ये देण्यात आली आहे.

३. समितीने दिनांक १८ नोव्हेंबर, २०२५ रोजी संमत केलेला अहवाल पुढीलप्रमाणे आहे :-

४. मान्य केलेली सुधारणा :

विधानसभा नियमात नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार विनंती अर्ज विधानसभागृहात सादर केले जातात व त्यानंतर तो विनंती अर्ज समितीकडे विचारार्थ पाठविण्यात येतो. तथापि, नि:सत्र कालावधीत एखादा विनंती अर्ज प्राप्त झाला तर तो सभागृहासमोर सादर करण्यास पुढील अधिवेशन सुरू होण्याची प्रतिक्षा करावी लागत असल्याने दरम्यानच्या कालावधीत सदर विनंती अर्ज विनाकार्यवाही किंवा तसाच प्रलंबित राहतो.

विधानपरिषदेत देखील अशाप्रकारे नि:सत्र कालावधीत प्राप्त झालेले विनंती अर्ज नियमातील तरतूदीमूळे प्रलंबित राहत असल्याने विधानपरिषदेने विनंती अर्ज नियमात सन २०२३ मध्ये सुधारणा केली असून त्यानुसार आता विधानपरिषदेत नि:सत्र कालावधीत प्राप्त झालेले विनंती अर्ज समितीकडे विचारार्थ पाठविता येतात.

विधानपरिषद विनंती अर्जासंदर्भातील नियमात करण्यात आलेली उक्त सुधारणा लक्षात घेता त्याच धर्तीवर विधानसभा नियमातही सदरहू सुधारणा अंतर्भूत करणे आवश्यक असल्याने त्यानुषंगाने नियम २७२ मध्ये आवश्यक ती सुधारणा करण्यात येत आहे.

हा अहवाल व त्याद्वारे महाराष्ट्र विधानसभा नियमात सुचविण्यात आलेली सुधारणा सभागृहाने स्विकारावी, अशी समितीची शिफारस आहे.

विधान भवन,<br>नागपूर,<br>दिनांक .......... डिसेंबर, २०२५.

ॲड. राहुल नार्वेकर,<br>अध्यक्ष तथा समिती प्रमुख,<br>विधानसभा नियम समिती.

# अनुसूची - एक

## विधानसभा नियमात प्राप्त झालेली सूचना/सुधारणा

| नियम क्रमांक | समासटिप | सूचना/सुधारणा | सुधारणेचे/सूचनेचे कारण | सूचना |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| २७२ | विनंती अर्ज सादर केल्यावर तो अर्ज विनंती अर्ज समितीकडे विचारार्थ पाठविणे | १. नियम २७२ मधील -<br>( १ ) पोटनियम (१) वगळण्यात येऊन तो नियम २७० नंतर नियम २७० (अ) म्हणून दाखल करण्यात यावा व त्यात खालील परंतुक दाखल करण्यात यावे.<br>" परंतु नि:सत्र कालावधीत प्राप्त झालेले विनंती अर्ज अध्यक्षांना त्यांच्या अधिकारात समितीकडे विचारार्थ पाठविता येतील "<br>( २ ) पोटनियम (२), (३) व (४) यांना अनुक्रमे (१), (२) व (३) असे नवीन क्रमांक देण्यात यावे.<br>( ३ ) समासटिपेमधील " विनंती अर्ज सादर केल्यावर तो अर्ज विनंती अर्ज समितीकडे विचारार्थ पाठविणे, समितीने तपासणी करणे व अहवाल सादर करणे." याऐवजी "समितीकडे विचारार्थ सोपविलेल्या विनंती अर्जाची तपासणी करणे व अहवाल सादर करणे." असा मजकूर दाखल करण्यात यावा. | विधानसभा विनंती अर्ज समितीस नि:सत्र कालावधीत प्राप्त होणाऱ्या सूचना सभागृहात सादर झाल्याशिवाय त्यावर पुढील कार्यवाही करता येत नसल्यामुळे अशा स्वीकृत सूचनांवरील पुढील कार्यवाही आगामी सत्र सुरु होईपर्यंत प्रलंबित राहते.<br>त्यामुळे विधानसभा विनंती अर्ज समितीच्या दिनांक ०६ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या बैठकीत "विनंती अर्जासंदर्भात विधानपरिषद नियमामध्ये जशी सुधारणा करण्यात आली आहे, त्याचधर्तीवर विधानसभा नियमात देखील सुधारणा करण्यात यावी." या घेतलेल्या निर्णयानुसार म.वि.स. नियम २७२ मध्ये सुधारणा होण्याबाबत. | **विधानसभा विनंती अर्ज समिती (ड-९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.** |

## अनुसूची - दोन

## समितीने विचारात घेतलेली आणि मान्य केलेली सूचना/सुधारणा

### भाग सतरा

### विनंती अर्ज

१. नियम २७२ मधील -

विनंती अर्ज सादर केल्यावर तो अर्ज विनंती अर्ज समितीकडे विचारार्थ पाठविणे

(१) पोटनियम (१) वगळण्यात येऊन तो नियम २७० नंतर नियम २७० (अ) म्हणून दाखल करण्यात यावा व त्यात खालील परंतुक दाखल करण्यात यावे.

"परंतु नि:सत्र कालावधीत प्राप्त झालेले विनंती अर्ज अध्यक्षांना त्यांच्या अधिकारात समितीकडे विचारार्थ पाठविता येतील"

(२) पोटनियम (२), (३) व (४) यांना अनुक्रमे (१), (२) व (३) असे नवीन क्रमांक देण्यात यावे.

(३) समासटिपेमधील "विनंती अर्ज सादर केल्यावर तो अर्ज विनंती अर्ज समितीकडे विचारार्थ पाठविणे, समितीने तपासणी करणे व अहवाल सादर करणे." याऐवजी " समितीकडे विचारार्थ सोपविलेल्या विनंती अर्जाची तपासणी करणे व अहवाल सादर करणे" असा मजकूर दाखल करण्यात यावा.

# परिशिष्ट एक

(समितीच्या बैठका)

## बैठक

विधानसभा नियम समितीची बैठक मंगळवार, दिनांक १८ नोव्हेंबर, २०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता, कक्ष क्रमांक ०४०, तळ मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

### उपस्थिती

(१) ॲड. राहुल नार्वेकर, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा
तथा समिती प्रमुख

### सदस्य

(२) श्री. किसन वानखेडे, वि.स.स.

(३) श्री. दीपक केसरकर, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्रीमती मेघना तळेकर, सचिव - २

(२) श्री . सुभाष नलावडे, सह सचिव (स.) तथा वि.का.अ.

(३) श्रीमती संगिता विधाते, अवर सचिव (स.)

(४) श्रीमती जयश्री म्हात्रे, कक्ष अधिकारी

**संसदीय कार्य विभाग**

(१) श्री. सतीश वाघोले, सचिव

(२) श्री. अनिल रा. राणे, अवर सचिव

सदरहू बैठकीमध्ये समितीकडे विचारार्थ असलेल्या सूचना/सुधारणावर विचारविनिमय करण्यात आला व समितीने प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

शासकीय मुद्रणालय, नागपूर